Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ३३]   गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ३०-ऑक्टोबर ६, २०२१/आश्विन ८-१४, शके १९४३   [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४५.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३४ व ३८ चे अनुषंगाने २३(१) अन्वये पवनी नगर परिषद क्षेत्राची विकास योजना (दुसरी सुधारित) तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक नपप-बांध-वि-६५४-२०२१.—

पवनी शहराची विकास योजना मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची अधिसूचना क्रमांक डी.पी. पवनी(सु.)-टिपीव्ही-२-४०८०, दिनांक १७ जून १९९१ अन्वये मंजूर झालेली असून ती दिनांक १ सप्टेंबर १९९१ पासून अंमलात आलेली आहे. नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २८ मार्च २०१८ अन्वये नगर परिषद पवनीची हद्द वाढ झालेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३४ व ३८ नुसार नगर परिषद क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची फेर तपासणी (सुधारित) करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३४ व ३८ च्या अनुषंगाने कलम २३(१) अन्वये पवनी, नगर परिषद विकास योजना (दु. सुधारित) तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ८, दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार पवनी, नगर परिषद विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा नगर परिषदेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६०(साठ) दिवसाच्या आत मुख्याधिकारी, पवनी नगर परिषद यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**विवेक डी. मेश्राम,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पवनी.

पवनी :
दिनांक १३ सप्टेंबर २०२१.

ना.-एक-अ-१ (१६१३).

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४६.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Declaration of Intention to prepare Development Plan (Second Revised) of Pauni Municipal Council as per Sections 34 and 38 read with Section 23 (*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. MCP-Const.D-654-2021.—

The Development Plan of Municipal Council, Pauni is sanctioned by Urban Development Department, Government of Maharashtra *vide* it's Notification No. D.P. Pauni(R) TPV-2-4080, dated the 17th June 1991 and it has came into force with effect from 1st September 1991. As per Urban Development Department Notification dated 28th March 2018 the Jurisdication of the Municipal Council, Pauni is extended by inclusion of the additional area. It is necessary to prepare Development Plan (Second Revised) for the area of Municipal Council as per provision of Sections 34 and 38 read with Section 23(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned development of the said area.

Hence, the Pauni Municipal Council by its Resolution No. 08, dated 13th August, 2021 has given consent to declare its intention to prepare Development Plan (Second Revised), as per provision of Sections 34 and 38 read with Section 23(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

This plan showing boundary of the area included in Development Plan of Pauni, Municipal Council is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Municipal Council, as required under Section 23(*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Pauni Municipal Council within the period of 60 (sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* This suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

VIVEK D. MESHRAM,
Chief Officer,
Municipal Council,
Pauni.

Pauni :
Dated the 13th September 2021.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिध्द झालेली आहे.**

**१६**

**शुक्रवार, सप्टेंबर २४, २०२१/आश्विन २, शके १९४३**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २७.

## आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल

क्र. मनपाना-नरवि-१०४६-२०२१.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३००(अ)-९७-नवि-९, दिनांक ०७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजूर झाली असून ती दिनांक ०१ मार्च २००० पासून अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-२०००-नवि-९, दिनांक १०-०९-२००१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २१-०९-२००१ पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६-नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्राअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरित नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला “नियोजन प्राधिकरण” म्हणून घोषित केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेत मौजा सिताबर्डी येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी. चौक या दरम्यानचा रस्ता ३० मी. रुंदीचा प्रस्तावित आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन/भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना मेट्रो व्हायडक्ट कम फोरलेन फ्लायओव्हरच्या बांधकामाकरीता मंजूर विकास योजनेतील प्रस्तावित ३० मी. रुंदीचा रस्ता सार्वजनिक प्रयोजनार्थ ३३ मी. रुंदीचा करणे आवश्यक आहे. यास्तव विकास योजनेतील प्रस्तावित असलेला ३० मी. रुंदीचा विकास योजना रस्ता ३३ मी. रुंदीचा करण्यास्तव फेरबदल करण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड व भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडून सादर करण्यात आलेला आहे;

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका हद्दीतील मौजा सिताबर्डी येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी. चौक या दरम्यानचा विकास योजना आराखड्यामध्ये दर्शविलेला ३० मी. रुंदीचा रस्ता विकास योजनेत ३३ मी. करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल करण्याचे ठरविले आहे व यासाठी नागपूर महानगरपालिकेने ठराव क्र. ३६३, दिनांक ५ मार्च २०१९ नुसार उपरोक्त फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नागपूर शहराच्या सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिकेच्या नगर रचना विभाग, श्री. छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तरी नागरिकांना सूचित

करण्यात येते की, ही सूचना प्रकाशित झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती महानगरपालिकेकडे प्राप्त होतील त्यावर महानगरपालिकेकडून सुनावणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा प्रस्तुत प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.

नागपूर :
दिनांक २३ सप्टेंबर २०२१.

**राधाकृष्णन बी.,**
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका,
नागपूर.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८.

## BY COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION

**Modification Under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. NMC-TPD-1047-2021.—

Whereas, the Revised Development Plan of Nagpur City prepared under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Section 31*(1)* has been partially sanctioned by the Govt. *vide* Urban Development Department Notification No. TPS-2496-2643-CR-300(a)-97-UD-9, dated 7$^{th}$ January 2000 and came into force from dated 1$^{st}$ March 2000. Excluded part of Development Plan has been sanctioned *vide* Govt. Notification No. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, dated 10$^{th}$ September 2001and came into force from dated 21$^{st}$ September 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as the "Planning Authority" for Nagpur City except the areas covered under seven schemes *vide* Govt. Notification No. TPS-2401-855-CR-76-UD-9, dated 27$^{th}$ February 2002;

And Whereas, in the said Revised Sanctioned Development Plan, the Municipal Corporation is desirous of making some modifications u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 as detailed below-

In the sanctioned Development Plan of Nagpur City, the 30 mtr. wide D.P. road is proposed between ' Patni Automobile to L.I.C. Square for Mouza Sitabuldi. Said 30 mtr. wide D.P. road is required to be widened to 33 mtr. as per requirement of Maharashtra Metro Rail Corporation/National Highway Authority of India for the construction of Metro Viaduct cum Four Lane Flyover & the proposal of modification for 30 mtr. wide D.P. road to be modified for 33 mtr. width as proposed by the Maharashtra Metro Rail Corporation/ National Highway Authority of India ;

And whereas, as per Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Nagpur Municipal Corporation has decided to modify 30 mtr. wide D.P. road into 33 mtr. from Patni Automobile to L.I.C. Square of Mouza Sitabuldi. And Nagpur Municipal Corporation has passed the resolution vide Resolution No. 363, dated 5$^{th}$ March 2019 to make the aforesaid modification.

The part plan of Development Plan of Nagpur City showing the aforesaid modification are kept open at the office of the Town Planning Deptt. of Nagpur Municipal Corporation for inspection by public during office hours on all working days. The suggestions and objections which may be received to Municipal Corporation in respect of the said modification to the Development Plan within a period of one month from the date of publication of this notice will be heard by the Municipal Commissioner before submitting the said modification proposal, to the State Government for sanction.

Nagpur :
Dated the 23$^{rd}$ September 2021.

RADHAKRISHNAN B.,
Commissioner,
Nagpur Municipal Corporation,
Nagpur.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.